संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# फिर एक बार देश का युवा बेरोजगार

फिर एक बार मोदी सरकार अशी घोषणा देत सत्तेवर आलेल्या नव्या सरकारच्या पहिल्याच दिवशी फिर एक बार देश का युवा बेरोजगार अशी पहिलीच सलामी त्यांच्याच केंद्र सरकारच्या सांख्यिकी आयोगाने दिली आहे. निवडणुकीपूर्वी हा विषय आला होता. परंतु सांख्यिकी आयोगाचा तो अंतिम अहवाल नाही तर तो केवळ ड्राफ्ट होता. अशी बतावणी करून वेळ मारून नेण्यात आली. आता सांख्यिकी आयोगाने निवडणुकीनंतर अजिबात वेळ न घालवता या सरकारचा ज्यावेळी शपथविधी होत होता त्याचदिवशी आकडेवारी जाहीर करून केंद्र सरकारचे दात त्यांच्याच घशात घालण्याचे काम केले आहे. गेल्या पंचेचाळीस वर्षात जेवढी बेरोजगारी वाढलेली नाही तेवढी गेल्या दोन वर्षात वाढल्याचे या आयोगाचे म्हणणे आहे. आकडेवारीनिशी वस्तुस्थिती स्पष्ट करणाऱ्या या अहवालामध्ये असे म्हटले आहे की बेरोजगारीचा हा दर सरासरी ६.१ टक्का सरकला आहे. शहरी बेरोजगारीचा दर ७.८ तर ग्रामीण बेरोजगार तरुणांचे प्रमाण ५.३ टक्के आहे. महिला आणि पुरुषांमधल्या बेरोजगारीची वस्तुस्थिती सांगताना हा अहवाल म्हणतो की पुरुषांचे बेरोजगारीचे प्रमाण ६.२ टक्के तर महिलांचे ५.७ टक्के आहे. गेल्या पंचेचाळीस वर्षात बेरोजगारी इतक्या शिगेला पोहचलेली नव्हती असे जर हा अहवाल वर्णन करीत असेल तर सरकारने त्याची किती प्राधान्याने दखल घेतली पाहिजे हे स्पष्ट होते. निवडणूक प्रचाराच्या आधी विरोधकांकडून बेरोजगारीचा प्रश्न वारंवार उपस्थित केला गेला. परंतु पंतप्रधान मोदींपासून त्यांच्या सर्व मंत्र्यांनी आणि बेरोजगारी नाहीच. उलट रोजगार वाढल्याचे दडपून सांगितले. खोटे बोला पण रेटून बोला या पध्दतीचा व्यवस्थित वापर केला गेला आणि बेरोजगारीच्या अतिशय गंभीर प्रश्नाचा निवडणूक प्रचार काळात शिताफीने विपर्यासही केला गेला. आता तर मोठ्या थाटामाटात सत्ताग्रहण करीत असतानाच बेरोजगारीच्या या प्रश्नाने नव्या सरकारला घरचाच आहेर दिलेला आहे. आता त्याचा स्वीकार करून कोणती नवी ध्येयधोरणे राबवायची याचा खुलासा सरकारला करावा लागेल.

### विकासदरही घटला

एकीकडे सांख्यिकी आयोगाने संख्यात्मक वस्तुस्थिती मांडली असताना दुसरीकडे देशाचे राष्ट्रीय उत्पन्नाचा दर हादेखील खाली घसरल्याचे गुणात्मक स्वरुपही समोर आले. राष्ट्रीय विकासाचा दर सहा टक्क्यांच्या वर जाईल अशी मोठी मिजास मिरवली जात असताना प्रत्यक्षात हा विकास दर ८.५ टक्के असल्याचे स्पष्ट झाले आहे. आंतरराष्ट्रीय स्तराचा विचार केला तर भारत चीनला मागे टाकेल आणि नवी विकास दर प्रस्थापित करेल अशा अगडबंब वल्गना केल्या गेल्या होत्या. परंतु परिस्थिती तशी नाही. उलट चीन भारतापेक्षा अव्वल स्थानावर आहे हे नव्या आकडेवारीतून स्पष्ट होते. प्रामुख्याने नोटबंदीच्या घोषणेनंतर बेरोजगारी आणि विकासदराला मोठा फटका बसला, औद्योगिक उत्पादनाचा दरही खाली घसरला. ही सगळी वस्तुस्थिती स्वीकारून त्याचा अभ्यास करण्याचे धाडस सरकारने दाखवले नाही कारण नोटबंदीच्या परिणामांची इतकी दाहकता असू शकेल याची कल्पनाच केंद्र सरकारला आली नाही आणि जर तसे धाडस असते तर नियोजनासाठी कौशल्य वापरावे लागले असते. परंतु निवडणूक जिंकण्याची घाई आणि आपल्याच निर्णयांचा प्रभाव कायम ठेवण्याचा हा प्रयत्न सरकारच्या आता अंगाशी आलेला आहे. हा प्रश्न जर निवडणुकीपूर्वी किमान तीन चार महिने देशासमोर आला असता. तर कदाचित आजचे राजकीय वेगळे राहू शकले असते. परंतु सरकारने राजकीय मखलाशीचा प्रयोग करून वस्तुस्थितीला दडवून ठेवले. परंतु आता बेरोजगारी कमी करण्याकरीता आणि विकास दराचा टप्पा दाखवण्याकरीता तितक्याच मोठ्या प्रयत्नांची पराकाष्ठा सरकारला करावी लागेल. विशेष म्हणजे या बेरोजगारांमध्ये पदव्युत्तर आणि उच्चशिक्षण घेतलेल्यांचेही प्रमाण लक्षणीय असल्याचे समोर येत आहे. म्हणजे शिक्षणावर भरमसाठ पैसा खर्च करूनही अपेक्षितपणाने नोकरी मिळत नसेल तर सरकारचे केवळ आर्थिक नियोजन चुकले आहे असे नाही तर शिक्षणाची आणि रोजगाराची सांगड घालण्यात मोठे अपयश आल्याचे ते निदर्शक ठरते.

### घोषणांमधला पोकळपणा

देशाच्या आर्थिक विकासाच्या गप्पा मारताना वस्तुस्थिती दडवता येत नाही. ज्याप्रमाणे सर्वसामान्य व्यवहारातसुध्दा झोपेचे सोंग आणता येते. पण पैशाचे सोंग आणता येत नाही. तोच प्रकार राष्ट्राच्याही अर्थव्यवस्थेला लागू पडतो. सरकारला आर्थिक विकासाचे सोंग आणता येणार नाही. त्यासाठी अतिशय काळजीपूर्वक औद्योगिक उत्पादन वाढवावे लागेल. काळाशी अनुरूप असे उद्योग व्यवसायाशी संबंधित निर्णय घ्यावे लागतील. स्वाभाविकपणे हे निर्णय घेताना ते उद्योग नोकऱ्या देणारे म्हणजेच बेरोजगारी दूर करणारे असतील याचीही काळजी घ्यावी लागेल. अन्यथा हीच परिस्थिती कायम राहिली तर बेरोजगारीचा हा प्रश्न एका मोठ्या असंतोषाचे कारण घडू शकतो. गेल्या पाच वर्षात केल्या गेलेल्या मेक इन इंडिया, स्टँड अप इंडिया, स्टार्ट अप इंडिया या सगळ्याच घोषणा कूचकामी ठरल्याचे शिक्कामोर्तबदेखील सांख्यिकी अहवालाने केले आहे. निदान आता तरी या घोषणांचा मोह सोडून सरकारने प्रत्यक्ष काम करून दाखवावे. जादूची कांडी फिरवून रोजगार निर्माण होत नसतात. त्यात सातत्य ठेवावे लागते. तशी धोरणे राबवली पाहिजेत. गेल्या पंचेचाळीस वर्षातला बेरोजगारीचा हा उच्चांक ठरत असेल तर केंद्रातल्या मोदी सरकारने या प्रश्नाचे महत्व लक्षात घेतले नाही. किंवा रोजगारवाढीचे सातत्य टिकवले नाही. असा त्याचा अर्थ होतो. भारताच्या एकूण लोकसंख्येमध्ये तरुणांचे प्रमाण जास्त आहे आणि ही परिस्थिती पुढची पंचवीस वर्षे कायम राहाणार आहे अशावेळी पुढच्या पंचवीस वर्षाचे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून रोजगारनिर्मितीचा भक्कम आराखडा तयार केला पाहिजे आणि देशातल्या युवा शक्तीच्या बुध्दीमत्तेचा गुणात्मक उपयोग केला पाहिजे.